आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)

गुरुवार, दिनांक : १४ मार्च, २०२४

ठळक बातम्या

1. स्वनिधी योजनेनं पथ विक्रेता वर्गाला आत्मनिर्भर केल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.

2. नागपूरचा मल्टी मोडल लॉजिस्टिक पार्क आणि सिंदी रेल्वे ड्राय पोर्ट यांसारख्या प्रकल्पाच्या माध्यमातून देशाचे लॉजिस्टिक कॅपिटल होण्याची नागपूरात क्षमता - केंद्रीय मंत्री गडकरी यांचं प्रतिपादन.

3. नागपुरात चिंचभवन आरओबी ते जामठा या २ पूर्णांक ६९ किलोमीटर लांबीच्या सहा पदरी उड्डाणपुलाचं आज सायंकाळी भूमिपूजन उपमुख्यमंत्री फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती.

4. रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत मुंबई संघाचा ४२ वा विजय; अंतिम सामन्यात विदर्भ संघाचा १६९ धावांनी केला पराभव.

#####

पीएम स्वनिधी

स्वनिधी योजनेने पथ विक्रेता वर्गाला आत्मनिर्भर केल्याचं सांगून या योजनेमुळे या वर्गाला मोठी स्वप्न पाहण्याचं बळ मिळाल्याचे गौरव उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज काढले. दिल्लीमधील जेएलएन स्टेडियम इथं सध्या पंतप्रधान स्वनिधी योजनेच्या लाभार्थ्यांना पंतप्रधान संबोधित करीत आहे. तत्पूर्वी त्यांनी दिल्लीमधील रस्त्यावरील **5,000** विक्रेत्यांसह **1** लाख एसव्हींना योजनेंतर्गत कर्जाचे वितरण देखील केलं.

दरम्यान केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री पथ विक्रेता आत्मनिर्भर निधी- (पीएम स्वनिधी) योजनेचा नागपूर शहरातील ७४ हजार ९१२ लाभार्थ्यांना पहिल्या टप्प्यातील लाभ मिळाला आहे.

कोरोनामुळे उद्भवलेल्या जागतिक आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर, वंचित घटकांना आर्थिक पाठबळ देण्याच्या पंतप्रधानांच्या दृष्टीकोनाला अनुसरून, **1** जून **2020** रोजी पीएम-स्वनिधी योजनेचा शुभारंभ करण्यात आला होता.

सिंदी रेल्वे कार्यक्रम

नागपूर हे देशाच्या केंद्रस्थानी असून, नागपूरचा मल्टी मोडल लॉजिस्टिक पार्क आणि सिंदी रेल्वे ड्राय पोर्ट यासारख्या प्रकल्पाच्या माध्यमातून, देशाचे लॉजिस्टिक कॅपिटल होण्याची क्षमता नागपूरात आहे असं प्रतिपादन, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज केलं. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या, नॅशनल हायवे लॉजिस्टिक मॅनेजमेंट लिमिटेड-एन.एच.एल.एम.एल. या, स्पेशल पर्पज व्हेईकल द्वारा, वर्धेच्या सिंदी रेल्वे इथल्या ड्रायपोर्ट आणि मल्टी मॉडेल लॉजिस्टिक पार्क इथं, रेल्वे टर्मिनल सेवांच्या संचालन परीक्षणाचा प्रारंभ आज केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते पार पडला. याप्रसंगी वर्धेचे खासदार रामदास तडस प्रामुख्यानं उपस्थित होते. यावेळी गडकरी म्हणाले की,

*हा प्रकल्प नेमका काय आहे? सोप्या भाषेत सांगायचं असेल तर मुंबईचा समुद्र आता सिंदी मध्ये आलेला आहे म्हणजे आपल्या इथं जे जामला आहे जे ४००-५०० कंटेनर ग्रेक हॉक बांग्लादेशला पाठवणार. आता त्याचे जे कंटेनर आहे ते इथून एक एक कंटेनर ट्रकने जे एन पी टी ला पाठवणार. जे एन पी टी वरून ते जातं कोलोम्बोला आणि कोलोम्बोवरून ते जातं ढाक्याला. आता इथल्या विदर्भातल्या कापसाची रुई, सूत, कपडा हे सगळा सिंदी रेल्वेच्या ड्रायपोर्ट मध्ये येईल. आणि आता यांना मुंबईला जायची गरज नाही. इथून गाडी आता डायरेक्ट कलकत्याला म्हणजे हल्दियाला जाईल आणि बांग्लादेश मधल्या नदीतून ते बांग्लादेशमध्ये जाईल. म्हणजे दीड लाख रुपये पर कंटेनर जे कॉस्ट होती ती एक लाख रुपये होईल. आणि ज्याच्यामुळे आता विदर्भातला कापूस आता स्वस्त होईल त्यामुळे बांग्लादेश मध्ये आपला माल जास्त जाईल आणि विदर्भातल्या शेतकऱ्याला कापसाला चांगली किंमत येईल.*

या प्रकल्पातील सुमारे **1,200** कोटी रुपयांच्या तरतुदींमुळं वर्धा आणि नागपूर शहरातील, मोठमोठ्या उद्योगांचं केंद्रीकरण या ठिकाणी होणार आहे. सिंदी इथं कस्टमचे कार्यालय असणार आहे. येत्या पाच वर्षांमध्ये जर हे ड्रायपोर्ट व्यवस्थित विकसित झालं तर एक लाख युवकांना रोजगार मिळेल अशी आशा देखील गडकरी यांनी व्यक्त केली.
याठिकाणी वर्धा जिल्ह्यातल्या युवकांना प्राधान्यानं रोजगार मिळाला पाहिजे यासाठी आपण प्रयत्न करू असं आश्वासनही त्यांनी यावेळी दिलं. याप्रसंगी बोलताना वर्ध्याचे खासदार, रामदास तडस यांनी सांगितलं की, सिंदी पोर्ट प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांना दुप्पट मोबदला देऊन भूसंपादन करण्यात आलं आहे.

एक देश एक निवडणूक

एक राष्ट्र एक निवडणूक संदर्भात माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीनं आज नवी दिल्लीत, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना अहवाल सादर केला. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

समितीनं सादर केलेला अहवाल १८  हजार ६२६ पानांचा आहे. या अहवालात सर्व संबंधित पक्ष आणि तज्ज्ञांशी झालेल्या विस्तृत चर्चा आणि १९१ दिवसांच्या संशोधनाच्या निष्कर्षांचा समावेश असल्याची माहिती कायदा आणि न्याय मंत्रालयानं दिला आहे.

अजित पवार गट

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारा दरम्यान, अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनं शरद पवार यांचं नाव किंवा त्यांचं छायाचित्र न वापरण्या संदर्भात शपथ पत्र द्यावं असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं अजित पवार गटाला दिले आहेत.
अजित पवार गटाला सर्वोच्च न्यायालयानं याबाबत फटकारलं असून, आता अजित पवार गटाची स्वतंत्र ओळख आहे. या ओळखीसह या गटानं मतदारांसमोर जावं असं न्यायालयानं म्हटलं आहे. या याचिकेची पुढील सुनावणी येत्या १९ मार्चला होणार आहे.

राहुल गांधी

शेतकरी आणि सर्वसामान्यांसाठी काँग्रेस सरकारचे  दरवाजे सदैव खुले असतील  असं काँग्रेस नेते आणि खासदार राहुल गांधी यांनी म्हटलं आहे. भारत जोडो न्याय यात्रेदरम्यान ते आज नाशिक जिल्ह्यात चांदवड इथं एका जाहीर सभेत बोलत होते. इंडिया आघाडीचं सरकार आल्यावर शेतकऱ्यांना जीएसटीमधून वगळणार असल्याचं , तसंच पीक वीमा योजनेची पुनर्रचना करणार असल्याचं आश्वासन त्यांनी दिलं.  हमी भावाचा कायदा करावा या मागणीसाठी शेतकरी दिल्लीच्या सीमेवर आणि रामलीला मैदानावर आंदोलन करत आहेत. मात्र सरकार त्यांची दखल घेत नाही. अशी टीका त्यांनी केली.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यावेळी म्हणाले की, आज द्राक्ष, कांदा, कापूस या शेतमालाला भाव मिळत नाही अशी परिस्थिती आहे. शेतकऱ्याला दोन पैसे मिळाले पाहिजेत अशी भूमिका घेतली पाहिजे. आज शेतकरी संकटात आहे त्याला भाजपाचे सरकार जबाबदार आहे असंही ते म्हणाले.

सहा पदरी करण रस्ता चिंचभवंन

नागपूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४च्या चिंचभवन आर.ओ.बी. ते जामठा या दोन पूर्णांक ६९ किलोमीटर लांबीच्या सहा पदरी उड्डाणपुलाचं तसंच पाच पूर्णांक ७४ किलोमीटरच्या रस्त्याच्या, सहा पदरी करणाचा भूमिपूजन सोहळा आज केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते, उप-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आज सायंकाळी सहा वाजता, चिंचभवन वर्धा रोड इथं होणार आहे. या प्रकल्पासाठी ६२० कोटी रुपयांचा खर्च प्रस्तावित असून, या आधुनिक पायाभूत सुविधांमुळं नागपूर शहराच्या एकंदर पायाभूत सुविधांच्या अद्ययावती करणात  भर पडणार आहे.

या कार्यक्रमाला भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची उपस्थिती राहणार आहे.

रणजी क्रिकेट

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई संघानं ४२वा विजय नोंदवला असून, अंतिम सामन्यात मुंबईच्या संघानं विदर्भ संघाचा, १६९ धावांनी पराभव केला. विजयासाठीचं ५३८ धावांचं आव्हान घेऊन मैदानात उतरलेला विदर्भाचा संघ ३६८ धावात गारद झाला.

या सामन्यात विदर्भ संघानं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण स्विकारलं. मुंबईनं आपल्या पहिल्या डावात २२४ धावा केल्या. त्याला प्रत्युत्तर देतांना, विदर्भाचा पहिला डाव केवळ १०५ धावांमध्ये संपुष्टात आला होता.

मुंबईनं आपल्या दुसऱ्या डावात ४१८ धावा करत विदर्भ संघापुढं विजयासाठी ५३८ धावाचं आव्हानं दिलं. दुसऱ्या डावात विदर्भ संघाच्या अक्षय वाडकर यानं १०२ आणि हर्ष दुबे यानं ६५ धावा केल्या.

आज दुसऱ्या डावात चार गडी बाद करणारा, तनुश कोटियन मालिकावीर ठरला तर मुशीर खान याला सामनावीर घोषित करण्यात आलं आहे. विदर्भ संघानं याआधी २०१८ आणि २०१९ मध्ये रणजी करंडक जिंकला होता.

सुभाष चौधरी

नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू सुभाष चौधरी यांच्या निलंबन आदेशाला उच्च न्यायालयाकडून स्थगिती देण्यात आली आहे. प्रतिवादी राज्यपाल यांना सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यासाठी चार आठवड्यांचा वेळ देण्यात आला आहे.

पेपर फुटी

अमरावतीमध्ये  २१ फेब्रुवारी रोजी, ड्रीमलँड इथल्या ए.आर.एन.असोसिएट या परीक्षा केंद्रावर, महाराष्ट्र शासनाच्या मृदा आणि जलसंधारण विभागाचा, अराजपत्रित अधिकारी पदाचा पेपर फुटल्यानं, राज्यभर खळबळ उडाली होती.

या प्रकरणात अकरा आरोपींना अटक करण्यात आल्यानंतर काल  या प्रकरणातील फरार मुख्य आरोपी अभिषेक  सावरीकर याला कर्नाटक राज्यातील कलबुर्गी इथून ताब्यात घेण्यात आलं. पोलीस पुढील कार्यवाही करत आहे.

हवामान

आज आणि उद्या नागपूर सह विदर्भात वातावरण शुष्क राहणार असल्याचा अंदाज, हवामान खात्यानं व्यक्त केला असून, **16** ते **19** मार्च दरम्यान, बुलढाणा आणि अकोला वगळता उर्वरित जिल्ह्यात हलक्या ते मध्यम पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान  विदर्भात आज सर्वाधिक तापमान, चंद्रपूर इथं ३९ पूर्णांक चार अंश सेल्सिअस नोंदविण्यात आलं.

लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार

गोंदिया जिल्ह्यातील आमगाव नगरपरिषद स्थापनेचा विषय मागील नऊ वर्षापासून सर्वोच्य न्यायालयात प्रलंबित आहे. त्यामुळं नागरिक मूलभूत सुविधांपासून वंचित ठरलं आहे. यावर नागरिकांनी एल्गार पुकारत आगामी लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला आहे.

आमगाव नगर परिषद संघर्ष समितीच्या माध्यमानं नगरपरिषद स्थापनेचा न्यायप्रविष्ठ प्रकरण राज्य सरकारनं निकाली काढावे यासाठी आता आक्रमक पवित्रा घेतला आहे.

रोजगार मेळावा

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील, डॉ.के.जी.देशमुख सभागृह इथं १९ मार्च रोजी सकाळी दहा वाजता, पंडित दिनदयाल उपाध्याय विभागीय रोजगार मेळाव्याचं भव्य आयोजन करण्यात आलं आहे.

सदर मेळाव्यामध्ये टाटा कन्सल्टंसी सर्व्हिसेसकडून लेखी परीक्षा आणि थेट मुलाखतीव्दारे, उमेदवारांची निवड केली जाणार असून, संबंधित विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन, कुलसचिव डॉ.तुषार देशमुख यांनी केलं आहे.

प्रधानमंत्री सुरज

समाजातील वंचित लोकांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी गाव पातळीवरील शासकीय यंत्रणेसह डिजीटल तंत्रज्ञानाचा वापर हा अधिक मोलाचा ठरला आहे. केंद्र शासनानं याद‍ृष्टीनं अधिक सुलभतेसाठी पंतप्रधान सामाजिक उत्थान रोजगार आधारीत, जनकल्याण ॲप मोलाचं आहे असं प्रतिपादन नागपूरचे जिल्हाधिकारी, डॉ.विपीन इटनकर यांनी काल केलं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पंतप्रधान सुरज या राष्ट्रीय पोर्टलचं लोकार्पण करण्यात आलं. यासाठी सामाजिक न्याय आणि अधिकारीता मंत्रालय अंतर्गत, भारतातील प्रमुख शहरात, दूरदृष्यप्रणालीद्वारे देशव्यापी शासकीय योजनांच्या लाभाचं वाटप करण्यात आलं.

नागपूरात हा समारंभ दीक्षाभूमी परिसरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर आडिटोरियम इथ आयोजित करण्यात आला होता.

ग.त्र्यं. माडखोलकर स्मृती व्याख्यानमाला

विदर्भ साहित्य संघाच्या वतीनं, ग.त्र्यं.माडखोलकर स्मृती व्याख्यान मालेचं आयोजन, येत्या १६ मार्च रोजी संध्याकाळी सहा वाजता करण्यात आलं आहे.

सुप्रसिद्ध विचारवंत आणि व्याख्याते, भानू काळे हे, "बदलता भारत" या विषयावर आपले विचार मांडतील. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते राहतील.

**######**